आगच्छत् शिक्षार्थम् । निर्गच्छत सेवार्थम् ।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद.

## मोड्यूल क्रमांक-१

## संघर्ष क्षेत्रातील शालेय नेतृत्वाची भूमिका



**प्रस्तावना-**

नवीन शैक्षणिक धोरणाच्या प्रास्ताविकेत म्हटल्याप्रमाणे संपूर्ण मानवी क्षमता साध्य करण्यासाठी, समन्यायी आणि न्याय्य समाजाचा विकास करण्यासाठी आणि राष्ट्रीय विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षण हे अत्यावश्यक आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हे आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि समानता, वैज्ञानिक प्रगती, राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक जोपासना या बाबत भारताची सतत होणारी प्रगती आणि जागतिक व्यासपीठावरील नेतृत्व यांची गुरुकिल्ली आहे. सार्वत्रिक उच्च दर्जाचे शिक्षण हे व्यक्ती, समाज, राष्ट्र आणि जगाच्या

कल्याणसाठी सर्वोत्तम मार्ग आहे. पुढील दशकात भारत हा जगात सर्वात तरुण लोकसंख्येचा देश असेल आणि या तरुणांना उच्च दर्जाच्या शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यावरच भारताचे उज्ज्वल भविष्य अवलंबून असेल.

सन २०१५ मध्ये भारताने स्वीकारलेल्या, शाश्वत विकासाच्या २०३० च्या SDG-४ - जागतिक शिक्षण विकासाच्या कार्य आराखड्यानुसार जगात सन २०३० पर्यंत "सर्वांसाठी सर्वसमावेशक आणि समन्यायी गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि निरंतर शिक्षणाच्या संधींना चालना देणे" हे ध्येय आहे. या सारख्या उदात्त ध्येयासाठी संपूर्ण शिक्षण व्यवस्थेस साहाय्य करण्यासाठी आणि शिक्षणास चालना देण्यासाठी बदल करणे आवश्यक असेल जेणेकरून शाश्वत विकासासाठी २०३० च्या कार्य आराखड्यातील सर्व महत्त्वपूर्ण उद्दिष्टे आणि ध्येय साध्य करता येऊ शकतील.

याचप्रमाणे सर्वांसाठी सर्वसमावेशक आणि समन्यायी गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करण्याची प्रक्रिया भारतामध्ये बालकांचा मोफत शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार सुरु झालेलीच आहे. प्रत्येक ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला आहे आणि मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी शासनाने उचललेली आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत मुलांना शिक्षण देणे आणि मुलांनी ते घेणे हे क्रमप्राप्तच आहे. आपल्या देशात शिक्षणासाठी शाळेची व्यवस्था गाव, वस्ती, तांडे, वाड्या अश्या प्रत्येकच ठिकाणी असलेली आढळून येते. वाड्या ,वस्त्या ,तांडे,व गावांमध्ये सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, भाषिक विविधता आहे. या विविधतेमुळे सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध समाज महाराष्ट्रात पहावयास मिळतो. पण कधीकधी या विभिन्नतेच्या अट्टाहासाने व काही समाज घटकांच्या महत्वकांक्षेतून काही सामाजिक, आर्थिक व राजकीय समस्या निर्माण होताना दिसून येतात. समाज आणि शाळा हे परस्परांशी निगडीत असलेले घटक आहे त्यामुळे समाजाचे प्रतिबिंब शाळेत उमटत असते. समाजात निर्माण झालेल्या समस्यांची झळ निश्चितपणे शाळेला कमीअधिक प्रमाणात लागल्याशिवाय राहत नाही.पण तरीही या समस्यांना तोंड देत मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे काम मुख्याध्यापक, शिक्षक करीत असतात. या विविध समस्यामुळे अश्या क्षेत्रातील मुलांचा एकात्मिक गुणवत्ता विकास करणे हे सहज सोपे काम नाही तरी आपल्यातील शालेय नेतृत्वाची कास धरीत अनेक शाळांनी अश्या परिस्थितीतही नेत्रदीपक यश प्राप्त केले आहे.

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे -**

- संघर्षात्मक क्षेत्र संकल्पना समजून घेणे.
- संघर्षात्मक क्षेत्रातील यश प्राप्त मुखाध्यापकाच्या कार्याचा अभ्यास करणे.
- संघर्षात्मक क्षेत्रात काम करण्यासाठी शालेय नेतृत्वाचा दृष्टीकोन विकसित करणे.

**संघर्षात्मक क्षेत्र संकल्पना –**

संघर्ष म्हणजे दोन किंवा दोन पेक्षा अधिक गटा मधील वैचारिक मतभेद, विरोध. संघर्ष ही मानवी जीवनात निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. जेव्हा व्यक्तींमध्ये ,गटामध्ये सहकार्य नसते किंवा ते एकमेकांसोबत तटस्थ सुद्धा नसतात तेव्हा संघर्षाची परिस्थिती उद्भवते. संघर्षाला समाजात अनैसर्गिक म्हणता येत नाही कारण जेव्हा बऱ्याच लोकांना मर्यादित ध्येय गाठायचे असते तेव्हा संघर्ष करणे स्वाभाविक असते. ऑक्सफोर्ड डिक्शनरीनुसार - दोन वर्ग किंवा गटांमधील सशस्त्र प्रतिकार, लढाई किंवा युद्ध म्हणजे संघर्ष आहे. सिद्धांत, विधाने, युक्तिवाद वगैरेला विरोध करणे हा देखील एक संघर्षच आहे. या मध्ये सामाविष्ट असणारे गट हे हिंसा, आक्रमकता, निषेध किंवा छळ

करण्याच्या धमक्यांद्वारे एकमेकांचे अहित साधण्याचा प्रयत्न करतात. संघर्ष ही एक प्रक्रिया आहे ज्यात संघर्ष करणारी व्यक्ती किंवा गट एकमेकांच्या क्रियांची दखल घेत असतात. त्यांचे लक्ष्य साध्य करण्याबरोबरच ते प्रतिस्पर्ध्यालाही वाटेपासून दूर करण्याचा प्रयत्न करीत असतात.




पण या सर्वाचा परिणाम हा त्या ठिकाणचे समाज जीवन उध्वस्त होण्यामध्ये होतो. हिंसा, आक्रमण या मुळे सर्व सामान्य लोकांचे जीवन बाधित होते आणि त्यांच्या दैनंदिन जीवनावर प्रतिकूल परिणाम होत असलेला आढळून येतो. शालेय जीवन हे सुद्धा या समाज जीवनाचाच अविभाज्य अंग आहे, त्यामुळे या संघर्षचा परिणाम तेथील शैक्षणिक व्यवस्थेवर प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे होताना आढळून येतो. या संघर्ष क्षेत्रा मध्ये विविध प्रकारच्या संघर्षाचा समावेश होतो.

१. वैयक्तिक संघर्ष
२. जातीय संघर्ष
३.वर्ग संघर्ष
४.राजनैतिक संघर्ष
५.आर्थिक संघर्ष
६.सामाजिक संघर्ष
७.धार्मिक संघर्ष
८.आंतरराष्ट्रीय संघर्ष
९.भाषिक संघर्ष

या मोड्यूल मध्ये वर्ग, जातीय,राजनैतिक व आर्थिक संघर्षाशी संबंधित नक्षल प्रभावित क्षेत्रा मधील शालेय नेतृत्वाचा अभ्यास आपण करणार आहोत.

## नक्षलप्रभावित क्षेत्र संकल्पना -

६०च्या दशकाच्या उत्तरार्धात पश्चिम बंगालमधील नक्षलबाडीत चारू मुजुमदार यांनी सुरू केलेल्या जमीनदारांविरोधातील आंदोलनाने पेट घेतला . या आंदोलनालाच पुढे ‘नक्षलवाद’ असे संबोधले जाऊ लागले. सामाजिक आणि आर्थिक विषमतेमुळे सुरु झालेल्या या चळवळीने उग्र रूप धारण केले आहे. झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, बिहार, छत्तीसगढ, आणि आंध्र प्रदेश,व महाराष्ट्र या भागात या चळवळीचा अजूनही मोठा प्रभाव आहे. २० राज्यांमध्ये २०० जिल्हे सध्या कमीअधिक प्रमाणात नक्षलप्रभावित आहेत.






महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा महाराष्ट्र राज्यात ईशान्य दिशेला असून आंध्र प्रदेश व छत्तीसगड राज्यांच्या सीमेलगत आहे. हा जिल्हा नक्षलग्रस्त आहे. जिल्हा जवळपास ७६ % जंगलाने व्यापलेला आहे. अहेरी, आरमोरी,एटापल्ली ,कोरची,भामरागड, सिरोंचा हे तालुके नक्षल प्रभावित तालुके आहेत. त्यामुळे या भागात प्रशासन आणि नक्षलवादी यांच्यात संघर्षच्या वारंवार घटना उद्भवतात. या सर्व घटनाचा परिणाम जनजीवन विस्कळीत होण्यामध्ये होता. या ठिकाणच्या शाळांवर प्रत्यक्ष जरी प्रभाव पडत नसला तरी नक्षलप्रभावा मुळे एकंदरीतच अध्ययन अध्यापन प्रक्रियेवर, शिक्षक व मुलांच्या मानसिकतेवर परिणाम झालेला दिसून येतो. नियमीतता, सातत्य यांचा अभाव शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये असते .

जे गाव नक्षलप्रभावित आहेत त्या गावातील शाळेमधील शिक्षक मानसिक दडपणाखाली असल्याचे निदर्शनास येते. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ते सोबतच स्वसंरक्षणाचाही विचार इथे काम करीत असताना करावा लागतो. गावातील लोकांच्या मानसिकतेचा विचार करून शाळेतील शैक्षणिक प्रक्रिया सुरु ठेवावी लागते. नक्षलप्रभावित गावातील गावकरी कोणत्या विचारसरणीचे आहेत याची माहिती नसल्याने शाळेमधील शैक्षणिक प्रक्रिया अतिशय दडपणाखाली सुरु असते. दहशतीच्या प्रभावामुळे शिक्षक बरेचदा पूर्ण कार्यक्षमतेने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेकडे लक्ष देवू शकत नाही.परिणामी या क्षेत्रातील शाळांचा गुणवत्ता विकास अपेक्षे प्रमाणे होत नसल्याचे आढळून येते.

**<u>नक्षल प्रभावित क्षेत्रा मधील शालेय नेतृत्वा समोरील आव्हाने-</u>**

शाळा हा समाजाशी अत्यंत घनिष्ट संबंध असलेला घटक आहे. शाळेचा समाजावर परिणाम होतो त्याचप्रमाणे समाजाचा सुद्धा शाळेतील घटकांवर परिणाम होताना दिसून येतो. शिक्षणाला समाज परिवर्तनाचे माध्यम म्हटले आहे. शाळा ज्या समाजात आहे त्या समाजाशी तिची बांधिलकी असते. शाळेच्या उत्कर्षा सोबतच या समाज बांधिलकीमुळे समाजाचा ही विकास घडून येत असतो. समाजाशी असलेल्या या तादात्म्यिकरणामुळे शाळेवर जसे काही अनुकूल परिणाम होतात तसेच काही प्रतिकूल परिणामसुद्धा पहावयास मिळतात.समाजाच्या या प्रतीकुलतेतूनच शालेय नेतृत्वा समोर काही आव्हाने निर्माण होतात.

१. **विद्यार्थ्यांशी संबंधित आव्हाने-**

समाजातील मुलांचे **शिकणे** सहज सोपे व योग्य दिशेने व्हावे म्हणून शाळांची व्यवस्था प्रत्येक लोकवस्तीच्या ठिकाणी केलेली आढळते. मुले शाळेत येतात ते ज्या कुटुंबात, समाजात राहतात त्या सर्वाचे रितीरिवाज व संस्कार घेवून. हे सर्व चालीरीती, पद्धती, संस्कार नेहमीच मुलांच्या दृष्टीने उपयोगी, फायदेशीर असतात असे नाही यासर्वाचा अनुकूल व प्रतिकूल परिणाम मुलांच्या विकासावर होताना दिसून येतो. यामुळेच शालेय नेतृत्वा समोर या विद्यार्थ्यांच्या संदर्भात काही आव्हाने सुद्धा निर्माण होतांना दिसून येतात.

नक्षल प्रभावित क्षेत्रामधील विद्यार्थ्या सोबत काम करीत असतांना सर्वात मोठ आव्हान जर कोणते असेल तर विद्यार्थ्यांची शाळेमधील अनियमितता. या नक्षलग्रस्त भागात कधी नक्षलवाद्याकडून तर कधी सुरक्षेच्या प्रश्नावरून प्रशासनाकडून बंद पाळले जातात त्यामुळे नियमित शाळांना अडचणी निर्माण होतात. वातावरणामुळे विद्यार्थ्यांना घरी राहून जंगलात फिरणे, शिकार करणे, शेती करणे यातच जास्त आवड असते. पूर्णवेळ शाळेत थांबणे त्यांना अडचणीचे वाटते . त्यामुळे अश्या अनियमित मुलांना नियमित विद्यार्थी बनविणे त्यांचा दृष्टीकोन बदलवून त्यांची शिकण्याबद्दलाची मनोभूमिका तयार करणे हे शालेय नेतृत्वासमोरचे सर्वात मोठे आव्हान आहे.

विद्यार्थ्यांची बोलीभाषा, शाळेबद्दलची अनास्था, कुपोषण, बुजरेपणा ,आत्मविश्वासाचा अभाव ही आव्हाने सुद्धा शालेय नेतृत्वा समोर असतात.त्याच प्रमाणे क्षेत्रातील भौगोलिक व सामाजिक परिस्थितीमुळे पुरेशा संधी अभावी आजच्या स्पर्धात्मक युगात आवश्यक असलेले पूरक वातावरण निर्माण करणे व टिकविणे हे शालेय नेतृत्वाला एक आव्हान असते.

**२. शिक्षकांशी संबंधित आव्हाने-**

नक्षलप्रभावित क्षेत्रा मध्ये काम करण्याचे मानसिक दडपण, ताण, भीती या स्वतःच्या वैयक्तिक आव्हानांना सर्व प्रथम शालेय नेतृत्वाला सामोरे जावे लागते. नक्षल प्रभावित शाळेमध्ये बदली झाली की प्रथम भीती मुळे शिक्षकांची शाळेमध्ये काम करण्याची मानसिकता राहात नाही .

त्यातही दळणवळणाच्या साधनांचा अभाव ,मुलभूत सोयीसुविधांची कमतरता यामुळे आधीच नकारात्मक भूमिका असलेले शिक्षक अधिक नकारात्मक होत जातात. मुलांचे भाषिक प्रश्न, अनुपस्थिती, पालकांची शाळेबद्दलची अनास्था ,व्यसनाधीनता या व अश्या कितीतरी प्रतिकूल कारणांमुळे शिक्षक पूर्ण कार्यक्षमतेने आपले कार्य करू शकत नाही. त्यामुळे अश्या शाळेत काम करणाऱ्या शालेय नेतृत्वाला अश्या सहकाऱ्याचे मनोधैर्य टिकवून ठेवणे, आपल्या सहकारी शिक्षकांचे अपेक्षित सहकार्य मिळविणे एक अवघड काम असते. अशा स्थितीत त्यांची मानसिकता बदलून त्यांना सतत कार्यप्रवण ठेवण्यासाठी प्रेरणा देणे आणि विद्यार्थ्यांच्या क्षमता संवर्धनासाठी कार्य करणे हे फार मोठे आव्हान असते.

प्रतिकूल सामाजिक परिस्थितीचा विपरीत परिणाम म्हणून बऱ्याचदा काही शिक्षक व्यसनाधीनतेकडे वळण्याची शक्यता असते. अशा स्थितीत व्यसनाधीन सहकारी शिक्षकांना सांभाळणे व विद्यार्थ्यांच्या दृष्टीने त्यांचा उचित उपयोग करून घेणे हे शालेय नेतृत्वापुढील एक आव्हान ठरते.

३. **पालकाशी संबंधित आव्हाने-**

नक्षलग्रस्त भाग मुळातच अतिदुर्गम जंगल व्याप्त, डोंगरग्रस्त प्रदेशात आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या मागास , आदिवासी समाजाचा यात अधिक समावेश दिसून येतो. येथील पालक पाल्याच्या शिक्षणा पेक्षा पोटभरण्याच्या विवंचनेत अधिक असल्याचे दिसून येतात. जीवन जगण्याच्या संघर्षात मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न दुय्यम ठरतो. शिक्षणा बद्दलची प्रचंड उदासीनता यामुळे मुलाने शाळेत शिकण्यापेक्षा जंगलात शिकार करणे, शेतात मदत करणे आणि पोटभरण्यास मदत करणे महत्वाचे असल्याने मुल शाळेत नाही गेले तर उत्तम अशी पालकांची मानसिकता असलेली आढळून येते.

या भागातील बहुसंख्य पालक स्वतः शिक्षित नसल्यामुळे घरी मुलांचा अभ्यास घेवू शकत नाहीत. त्यामुळे घरच्या अभ्यासासाठी पालकांवर अवलंबून राहता येत नाही. स्वच्छतेबाबत पालकांमध्ये पुरेशी जागरुकता आढळून येत नाही. दारिद्र्यामुळे आवश्यक पुरेशे अन्न मिळत नसल्यामुळे तसेच अज्ञान व अंधश्रद्धा, यासारख्या समस्या मुळे पालक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे व आरोग्याकडे दुर्लक्ष करतात.

शिक्षणाने दोनवेळचे पोट भरत नाही हा दृष्टीकोन असल्याने पाल्याचे शिक्षण हा त्यांचा मुलभूत प्रश्न नाही. मुल शिकले नाही तरी त्या बाबतीत त्यांना काही वावग वाटत नाही.त्यामुळे अश्या नकारात्मक मानसिकता असलेल्या पालकांना पाल्याच्या शिक्षणाबाबत सजग बनविणे, शिक्षणाबद्दल आस्था निर्माण करणे, मुलांना शाळेत

नियमित पाठविण्याबाबत मन वळविणे,६ ते १४ वयोगटातील प्रत्येक मुल शाळेत यावे,टिकाव व शिकावं म्हणून सर्व स्तरावरून प्रयत्न सुरु आहेत पण जो पर्यंत या पालकांची मानसिकता तयार होत नाही तोपर्यंत या नक्षलग्रस्त भागातील नेतृत्वाला अशा अनेक आव्हानांना तोंड देतच राहावे लागणार आहे.

**४. समाजाशी संबंधित आव्हाने-**

विदर्भातील गडचिरोली,गोंदिया व चंद्रपूर हे नक्षलप्रभावित जिल्हे आहेत. या नक्षलप्रभावीत जिल्ह्यातील सर्वसामान्य समाज हा आदिवासी असलेला आढळून येतो. जंगलव्याप्त अतिदुर्गम क्षेत्रातील हा अशिक्षित आदिवासी समाज नेहमीच नक्षलवादी व प्रशासन यांच्या संघर्षात भरडल्या जातो. या संघर्षाचा परिणाम म्हणजे या क्षेत्राच्या विकासाचा अभाव. आरोग्य, शिक्षण,पाणी ,वीज,दळणवळणाची साधने व सरकारी योजना या बाबत अनेक प्रश्न या संघर्षामुळे निर्माण झाले आहेत. त्यात रोजगाराचा अभाव, अशिक्षितपणा, अंधश्रद्धा यामुळे अनेक सामाजिक प्रश्नाच्या विळख्यात असलेल्या या क्षेत्रातील शालेय नेतृत्वा समोर अनेक प्रश्न आहेत.

या दुर्गम भागातील समाजाच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे शाळेच्या भौतिक सोयी सुविधेसाठी लोकसहभाग मिळविणे शालेय नेतृत्वापुढे एक आव्हान असते. जीवन जगण्याच्या समस्यात अडकलेला हा समाज शिक्षणाबद्दल प्रचंड अनास्था असलेला दिसून येतो. स्वातंत्र्य मिळून ७३ वर्ष झाली पण शाळेची एकदाही पायरी न चढलेल्या कितीतरी पिढ्या येथे दिसून येतात. या समाजाला शिक्षणाची जाण देणे, समाजाच्या विकासात शिक्षणाचे महत्व समाजघटकासमोर मांडणे त्याची जगण्याला काय मदत होऊ शकते ह्याची अनुभूती या समाजाला देणे म्हणजे या ठिकाणच्या शाळा टिकतील. या सारखे चिंतनीय प्रश्न या क्षेत्रातील शालेय नेतृत्वासमोर आहेत.

पण प्रत्येक परिस्थितीला काही अपवाद असतात त्याच प्रमाणे या विविध आव्हानांना तोंड देत याच नक्षलप्रभावित भागातील काही शाळा गुणवत्ताप्राप्त शाळा म्हणून पुढे आल्या आहेत. या शाळांची यशोगाथा वाचल्यास आपणास कळेल अनेक शिक्षकांना गुणवत्तेत अडसर वाटणारी ही समस्या या मुख्याध्यापकांनी सोडविली व आपली शाळा गुणवत्तेत अग्रेसर करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या.

# मुख्याध्यापक यशोगाथा

## मुख्याध्यापकाचे नाव – विनीत बंडू पद्मावार

**<u>शाळा-जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोयानागुडा, पंचायत समिती भामरागड जिल्हा गडचिरोली.</u>**

विनीत बंडू पद्मावार मुळचे यवतमाळचे. जानेवारी २०१३ मध्ये प्रथमच जिल्हा परिषद गडचिरोली येथील शिक्षण विभागात रुजू झाले. अतिदुर्गम, आदिवासी, नक्षलप्रभावित असलेल्या पंचायत समिती भामरागड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेजूर या शाळेचा आदेश त्यांना प्राप्त झाला. नोकरी मिळण्याच्या आनंदावर या पंचायत समितीच्या नावाने थोडसे विरजण पडले. पण नोकरी मिळालीच आहे तर ती कुठेही जाऊन उत्कृष्टपणे करायची असे ठरविलेले विनीत सर मुख्याध्यापका सोबत रुजू होण्यासाठी शाळेत गेले. शाळेचे प्रथमदर्शन अतिशय विदारक होते. तुटलेल्या छपराची अतिशय अस्ताव्यस्त सामान असलेली ,पडक्या भिंती, असलेली एक खोली, तिला शाळेची पाटी लावलेली असल्याने शाळा म्हणायची. एकही विद्यार्थी नसलेल्या शाळेत विनीत सर रुजू झाले. धान्य काढण्याचा महिना असल्याने एकही विद्यार्थी शाळेत येत नसल्याची माहिती मिळाली. तसे ही शाळेत रोजच आले पाहिजे असे काही नाही अशी माहिती त्यांना बस मधील काही व्यक्तींनी आधीच पुरविली होती कारण आदिवासी मुले म्हणजे रानात फिरणारे, शिकार करणारे, भटके मुले. ते एका जागी बसणे कठीणच. विद्यार्थी अश्याच प्रकारे शाळेतच येत नसेल तर शाळेत येऊन काय करायचे असा यक्ष प्रश्न या नव्या उत्साही शिक्षकाला पडला.

दुसरा दिवसही असाच विद्यार्थ्यांची वाट पाहण्यात गेला. मुख्याध्यापकांना ही गोष्ट सवयीची होती. त्यामुळे त्यांना या बाबीचे फारसे काही वेगळे वाटत नव्हते. पण विनीत सर मात्र अस्वस्थ झाले. गावात कोणीच भेटत नव्हते व भेटले तर ते माडिया बोलणारे त्यामुळे संवाद होवूच शकत नव्हता. दुसऱ्या दिवशी गावात एक तरुण असा भेटला की ज्याला थोडफार मराठी समजत होते त्याने दुभाषका चे काम करण्याचे आश्वासन विनीत सरांना दिले. या प्रयत्नाला प्रतिसाद मिळाला. पालक भेटीतून दोन चार विद्यार्थी शाळेत यायला सुरुवात झाली. पुढे शाळे मध्ये १०-१२ विद्यार्थी नियमित यायला लागली आणि विनीत सरांच्या नियमित शाळा विकास कार्याचा शुभारंभ झाला.

शाळेत मुले यायला लागली अध्ययन अध्यापन प्रक्रियेला पण सुरुवात झाली पण नक्षलप्रभावित भागा मध्ये काम करीत असतांना मनावर कायम एक अनामिक भीतीचा प्रभाव असायचा . गाव कोअर क्षेत्रातील त्यामुळे आजूबाजूला या लोकांचा सततच वावर असल्याचे निदर्शनास येत होते. प्रत्यक्ष नाही पण अप्रत्यक्षपणे शालेय वातावरणात त्यांचा नकळत प्रभाव जाणवतो असे सरांचे म्हणणे आहे. शाळेमध्ये काय करायचे ,काय नाही या बाबत विचारपूर्वक नियोजन करावे लागते. शाळेमधून कोणी पालक दुखावला जाऊ नये याची सतत दक्षता घ्यावी लागते. स्वतंत्रता दिवस, प्रजासत्ताक दिन साजरा करीत असतांना प्राण कंठाशी येतो असा सरांचा अनुभव आहे.

२०१२ मध्ये विनीत सरांकडे मुख्याध्यापक पदाचा कार्यभार आला आणि विनीत सरांच्या नेतृत्वाने मग तेथून मागे वळून पहिले नाही. सरांचा उपक्रमशील व धाडसी स्वभाव यामुळे शाळेत रोज नवनवीन गुणवत्तात्मक परिवर्तनाला प्रारंभ झाला. आधी फटकून वागणारे गावकरी उत्सुकतेने शाळेत यायला लागले मदत करायला लागले. सरांना जपून राहण्या बद्दल एकदोनदा सूचना मिळाल्या. आजूबाजूच्या गावातील मनाला घाबरविणाऱ्या घटना कानावर आल्या की काही काळासाठी सरांचे मनोधैर्य ढासळत होते. पण अतिदुर्गम भागातील लेकरांच्या चेहऱ्याकडे बघून पुन्हा ते नव्या जोमाने कामाला लागायचे. आपल्या लेकरांची प्रगती बघून आता संपूर्ण गाव विनीत

सरांचे शब्द मानायला लागले होते. गावकर्यांना सरांचा खूप मोठा आधार होता. सरांच्या अथक प्रयत्नाचे फळ म्हणजे ३० एप्रिल २०१६ ला जिल्ह्यातील पहिली interactive digital school म्हणून बेजूर शाळेला मान मिळाला. शिक्षण आयुक्तांपासून तर यंत्रणेतील प्रत्येक घटकाने  सरांचे कौतुक केले व सोबतच आर्थिक मदतही केली. बेजूर शाळा जिल्ह्यातील गुणवत्ता प्राप्त शाळा बनली. अनेक शिक्षक शाळेला आवर्जून भेटी द्यायला व  त्यांचा गुणवत्तेचा प्रवास समजून घ्यायला यायला लागले. जी मुले शाळेतच येत नव्हती  मराठीत आपले नाव सांगू शकत नव्हती  ती आज कविता करू लागले आहेत. स्वतःच्या बोलीभाषे सोबतच मराठी भाषेतही गोष्टी लिहू लागले आहेत. मे २०१८ मध्ये विनीत सरांची बदली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोयनागुडा येथे झाली आणि पुन्हा शून्या पासून सुरुवात करावी लागली. आता भरीस भर म्हणजे पावसाळ्यात तुडुंब भरलेल्या नाल्यातून  गावात जायला डोंग्यातून जावे लागे. भामरागडचा पाऊस म्हणजे वर्षातून चार महिने गावाचा संपर्क इतर जगाशी तोडणारा. एकदा तर सर नाल्यातून सायकल काढीत असतांना वाहून जात होते गावकऱ्यांनी वाचविले. या पण गावात सारखीच परिस्थिती नक्षलप्रभाव, मनावरील भीतीचे ओझे घेऊन आणि आधीच्या शाळेतील यशस्वी अनुभव सोबत घेऊन विनीत सरांनी कामाला सुरुवात केली.



कोणत्या मार्गाने गेले तर यश मिळते याचा अभ्यास आता झाला होता त्यामुळे आता विनीत सर आपल्या सहकाऱ्याच्या मदतीने  कोयनागुडा शाळेच्या सर्वांगीण गुणवत्तेसाठी सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहेत. याचे परिणाम आताच दिसायला लागले आहे.  इयत्ता १ते ५  च्या शाळेत ३२ पटसंख्या आहे. मुलांची गुणवत्ता कौतुक करण्यासारखी आहे. समाज सहभागातून शाळेच्या सर्व भौतिक सुविधा पूर्ण झालेल्या आहेत. शाळेत तंत्रज्ञानाचा उपयोग करून मुले शिकत आहेत. यामुळेच विभागातील उच्च पदस्थ अधिकारी  ते सामान्य शिक्षक या सर्वांनाच अतिदुर्गम भागात अतिशय प्रतिकूल परिस्थितीत  काम करणाऱ्या विनीत सरांचे कार्य बघण्यासाठी नक्कीच पुन्हा पुन्हा  जावेसे वाटते.



**चिंतनात्मक प्रश्न -**

१ ) विनीत सरांच्या यशोगाथेबद्दल तुमचे मत/ अभिप्राय लिहा.

२) संघर्षात्मक क्षेत्रात काम करीत असतांना विनीत सरां समोर असलेल्या आव्हानांची यादी करा.

३) विनीत सरांना या क्षेत्रात काम करतांना कोणत्या दक्षता घेणे गरजेचे होते ?

४ ) अशा क्षेत्रात काम करण्यासाठी कोणत्या नेतृत्व कौशल्याची गरज आहे असे आपणास वाटते ?

५) अशा प्रकारच्या संघर्षात्मक क्षेत्रात तुम्हाला काम करण्याची वेळ आल्यास तुम्ही काय कराल?

**विचार करूया, चर्चा करूया -**

१. नक्षलप्रभावित अतिदुर्गम क्षेत्रातील एका जिल्ह्य परिषदेच्या शाळेचे तुम्ही मुख्याध्यापक आहात. शाळेची पटसंख्या ३५ आहे. पण तुमच्या गावा शेजारील मार्गावर भूसुरुंग लावण्यात आल्याची गावात चर्चा आहे .यामुळे आठ दिवस झाले तरी विद्यार्थ्यांना शाळेत पाठवायला पालक तयार नाहीत. अशा परीस्थितीत तुम्ही काय कराल.
२. अतिसंवेदनशील नक्षलप्रभावित क्षेत्रात तुमची बदली झालेली आहे. आता पर्यंत जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या शाळेत काम करण्याचा अनुभव असलेले तुम्ही अशा परिस्थितीत काय निर्णय घ्याल .

**नक्षलप्रभावित क्षेत्रात काम करताना असेही करता येईल-**

१. या क्षेत्रात यशस्वीपणे काम करायचे असेल तर सर्वात महत्वाचे म्हणजे पालकांचे प्रबोधन गृहभेटी,पालक मेळावे ,मातापालक मेळावे यातून त्यांच्या मध्ये शाळेबद्दल विश्वास निर्माण करणे.

२. शाळेस रंगरंगोटी करून सजविणे, विविध खेळ, digital साहित्य, नाट्यीकरण, क्षेत्रभेटी इत्यादी माध्यामातून विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लावता येईल. त्यातून त्यांना समृध्द व प्रत्यक्ष अनुभूती देणे
३. विद्यार्थी व पालक यांच्या मनातील भीती कमी करून प्रशासना बद्दल विश्वास निर्माण करणे.
४. शक्य होतील तेवढे स्थानिक बोलीभाषेचे शब्द वापरणे.
५. ग्रामशिक्षण समितीच्या मदतीने शाळाविकास आराखडा तयार करून शाळेसाठी भौतिक सुविधा उपलब्ध करून घेणे. ग्रामपंचायत कडून काही निधी मिळवून घेणे. शाळेच्या चांगल्या उपक्रमांचे सामाजिक माध्यमांद्वारे प्रदर्शन करून शाळेसाठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध होण्यासाठी लोकसहभाग / CSR मिळविणे.
६. काही वेळा संघर्षमय परिस्थिती निर्माण झाल्यास पालक व विद्यार्थ्याना धीर देणे
७. स्थानिक समाजातील शिक्षित व्यक्तींच्या मदतीने / परिसरातील स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने/ digital साधनाच्या मदतीने गावात ठिकठिकाणी सभा घेवून शिक्षण व आरोग्यविषयक, समाजातील अनिष्ट रूढी परंपरा याबाबत उचित जागृती व समाजप्रबोधन करणे .
८. स्थानिक महत्वाच्या सणादरम्यान गाव व शाळा मिळून एकत्रित शिक्षणोत्सव / ग्रामोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करणे.
९. शाळेच्या परिसरात सहकारी शिक्षक व ग्रामस्थांच्या मदतीने विद्यार्थ्यांसाठी बाल वाचनालय, मनोरंजन,आरोग्य व क्रीडा केंद्र, बालसंसद, बालसभा, अभ्यास केंद्र, इत्यादी नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करता येईल.
१०. विविध गुणदर्शन, निबंधलेखन, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला, प्रश्नमंजुषा, क्रीडा स्पर्धा इत्यादी माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण करावे.

## शाळा विकास आराखडा/ नियोजन –

सध्या तुम्ही कार्यरत असलेल्या शाळेतील सामाजिक ,आर्थिक भौतिक सांस्कृतिक क्षेत्रा बद्दल तुम्हाला ज्ञान आहे. तुमच्या शाळेतील सकारात्मक घटक व कच्चे दुवे यांची तुम्हाला जाणीव आहे. तुमचे उपलब्ध मनुष्यबळ व त्यांच्या सोबतच्या आंतरक्रिया याबद्दलची तुम्हास माहिती आहे. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करून एक वर्षाचा शाळा विकास आराखडा तयार करा.

## नक्षलप्रभावित क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या विशेष योजना-

१. नक्षलवाद्यांना गावबंदी केलेल्या गावांना प्रोत्साहन योजना

२. नक्षलप्रभावित भागामध्ये किशोर मुलामुलींच्या उन्नतीसाठी आपला महाराष्ट्र सुवर्ण जयंती योजना

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने संघर्षात्मक क्षेत्रातील शिक्षणाच्या संदर्भाने केलेले विचार

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात संघर्षात्मक क्षेत्रातील शिक्षणाच्या संदर्भात जरी स्पष्ट विचार मांडलेले नसले तरी भाग १ शालेय शिक्षणा मधील प्रकरण ६ - समन्यायी व समावेशित शिक्षण यामध्ये भौगोलिक ,सामाजिक व आर्थिक दृष्ट्या समस्याग्रस्त मुलांच्या शिक्षणा संदर्भात पुढील अनेक बाबी प्रस्तावित केल्या आहे.

**समन्यायी आणि समावेशीत शिक्षण : सर्वांसाठी शिक्षण**

- सर्व मुलाना अध्ययनाच्या आणि उत्कर्षाच्या समान संधी मिळाव्यात आणि सन २०३० पर्यंत सर्व लिंगाच्या व सामजिक वर्गवारीच्या सहभागामध्ये व अध्ययनाच्या निष्पत्तीमध्ये समानता असावी या उद्देशाने एक सर्व समावेशक व न्याय शिक्षण प्रणाली अस्तित्वात आणणे.

- सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील इयत्ता १ ली ते १२ वी च्या पटनोंदणीचे प्रमाण चांगले दिसत असले तरी अशी मुले आणि मुख्यतः मुली शिक्षण पूर्ण करीत नाहीत त्याला विविध कारणे दिसून येतात.

- वेगवेगळ्या ऐतिहासिक आणि भौगोलिक कारणामुळे आदिवासी जाती आणि समुदायातील मुले सुद्धा अनेक स्तरावर प्रतिकूल परिस्थितीशी सामना करतात. आदिवासी समुदायातील मुलांना ते घेत असलेले शालेय शिक्षण भिन्न, सांस्कृतिक आणि शैक्षणिकदृष्ट्या अप्रासंगिक आणि अपरिचित वाटते.त्यातून या मुलांच्या शिक्षणाच्या समस्या निर्माण होतात.

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शालेय शिक्षणातील सामाजिक प्रवर्गातील दरी कमी करण्यावर लक्ष केंद्रित करण्यावर स्वतंत्र कार्यनीती तयार केली जाईल.

- याशिवाय, विद्यार्थी शिष्यवृत्ती, मुलांना शाळेत पाठविण्यासाठी आई-वडिलांना सशर्त नगदी रक्कमेचे प्रदान, शाळेत येण्या-जाण्यासाठी सायकल देणे यांसारख्या यशस्वी आणि वेगवेगळ्या नीती आणि धोरणे चालू करण्यात येणार आहेत. यामुळे सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित गटाची (SEDGs) भागीदारी शालेय शिक्षणात वाढण्यास मदतच होईल.. या नीती/धोरणांना आणि योजनांना संपूर्ण देशात अधिक प्रबळ करण्याची गरज आहे.NEP २०२० मध्ये या बाबीकडे विशेष लक्ष देण्यात येईल.

- NEP २०२० नुसार काही भौगोलिक क्षेत्रामध्ये प्रामुख्याने सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित गट (SEDGs) हा मोठ्या प्रमाणात आहे, असे आकडेवारी दर्शविते. आकांक्षित जिल्हे म्हणून ओळखलेल्या भौगोलिक ठिकाणी शैक्षणिक विकासास प्रोत्साहन देण्यासाठी खास उपक्रमाची आवश्यकता आहे. म्हणून शैक्षणिक दृष्ट्या वंचित सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित गट (SEDGs) यांचे मोठ्या लोकसंख्याचे क्षेत्र हे विशेष शैक्षणिक क्षेत्र (SEZs) म्हणून घोषित केले जावे. तेथील शैक्षणिक परिस्थिती बदलण्यासाठी अतिरिक्त भरीव प्रयत्नाच्या माध्यमातून सर्व योजनाची व्यापकपणे अंमलबजावणी केली जाणार आहे..

- सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित गट (SEDGs) अंतर्गत आणि उपरोक्त वर्णन केल्याप्रमाणे धोरणातील मुद्यांच्या संदर्भात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्या शैक्षणिक विकासातील असमानता दूर करण्यासाठी विशेष लक्ष दिल्या जाईल. शालेय शिक्षणात सहभाग वाढविण्यासाठीच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून सर्व सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित गटांमधून (SEDGs) प्रतिभावंत आणि कुशाग्र बुद्धीच्या विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर संबंधित क्षेत्रामध्ये विशेष वसतिगृहे, सेतू पाठ्यक्रम आणि शुल्क माफी करण्यासाठी तसेच शिष्यवृत्तीच्या माध्यमातून माध्यमिक स्तरावर आर्थिक सहाय्य प्रदान केल्या जाईल. त्यामुळे उच्च शिक्षणामध्ये या गटातील मुलांचा प्रवेश अधिक सुलभ होईल .

## संघर्षात्मक क्षेत्रातील नेतृत्वाची भूमिका या मोड्यूलची शालेय नेतृत्वाच्या दृष्टीकोनातून उपयुक्तता

शिक्षक प्रशिक्षणानमध्ये आजपर्यंत संघर्षात्मक क्षेत्रातील शिक्षणाबाबत च्या समस्या नेहमी दुर्लक्षितच राहिल्या आहेत. स्पष्टपणे या समस्यांबाबत आजपर्यंत यावर विचार करण्यात आलेला नाही असे निरीक्षणाअंती दिसून येते त्यामुळे सदर मोड्यूलचा उपयोग अश्या प्रकारच्या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या नेतृत्वाला तर होईलच पण इतरही कार्यक्षेत्रातील शैक्षणिक नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींसाठी निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.या मोड्यूल मुळे पुढील परिणाम साधता येतील

- शिक्षण हक्क कायदा २००९ ची यशस्वी अंमलबजावणी
- प्रत्येक विद्यार्थ्याचा शिक्षण हक्क बाधित होऊ न देता शिक्षणप्रक्रिया
- संघर्षात्मक क्षेत्रासंबंधित येणाऱ्या समस्यांचे पृथक्करण,विश्लेषण करून समस्येची सोडवणूक
- OUT OF THE BOX जाऊन काम करण्याची प्रेरणा
- बहुकार्यप्रवणतेसह विविध SOFT स्किल्स चा उपयोग करून समस्या निराकरण कौशल्याचा विकास

## समारोप –

संघर्षात्मक क्षेत्रात काम करणे व यश मिळविणे हे अतिशय कठीण काम आहे, तिथे असलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या सामाजिक समस्यांना तोंड देत तेथील शाळांचा विकास हे आव्हानात्मक काम आहे. देशात सर्वत्र विद्यार्थी सारखेच असतात फरक असतो तो त्यांच्या विविधंगी परिस्थिती मध्ये. या ठिकाणी नेतृत्व करीत असतांना सर्वसामान्य शाळेतील परिस्थिती पेक्षा वेगळ्या नेतृत्व गुणांची गरज निश्चितपणे असते. आपल्या राज्यात अशा संघर्षात्मक क्षेत्रात यशस्वीपणे काम करणारे मुख्याध्यापक अनेक ठिकाणी गुणवत्तेचे यश प्राप्त करीत असताना आढळून येतात . त्यांच्या कार्याचा अभ्यास केलां तर त्यांनी या परिस्थितीत स्वतः कोणते नेतृत्व कौशल्य विकसित करीत यश मिळविले याची प्रचीती येते. हे मुख्याध्यापक करू शकतात तर प्रत्येकच मुख्याध्यापक सुद्धा आपल्यातील नेतृत्व कौशल्य विकसित करून अश्या संघर्षात्मक क्षेत्रात यश प्राप्त करू शकेल.

**संदर्भसूची-**


१. शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम, पूरक वाचन साहित्य, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद
२. गारे गोविंद, नक्षलवादी व आदिवासी, सुगावा प्रकाशन, पुणे २००३
३. निष्ठा, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार, डिसेंबर २०१९,संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र,पुणे.
४. https://www.loksatta.com/vishesh-news/how-to-prevent-naxalism-1465893/
५. https://www.loksatta.com/sampadkiya-news/to-understand-naxalism-122523/ https://hi.wikipedia.org/wiki/%E0%A4%B8%E0%A4%82%E0%A4%98%E0%A4%B0%E0%A5%8D%E0%A4%B7
६. https://hi.wikipedia.org/wiki/%E0%A4%A8%E0%A4%95%E0%A5%8D%E0%A4%B8%E0%A4%B2%E0%A4%B5%E0%A4%BE%E0%A4%A6
७. https://maharashtratimes.indiatimes.com/editorial/article/-/articleshow/5919653.cms
८. http://mahatribal.gov.in/ALL%20SCHEMES.pdf
९. http://mr.vikaspedia.in/learning-resources



डॉ किरण धांडे
**वरिष्ठ अधिव्याख्याता**
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,**
**गोंदिया.**